**महाराष्ट्र शासन**

(स्वच्छ भारत मिशन ग्रामीण, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जि.प. नागपूर)

# जाहिरात

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत जिल्हयातील ग्रामीण भागात तालुकास्तरावर प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्रांची निर्मीती करण्यात येत आहे. प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्र व्यावसायिक पध्दतीवर चालविणे, केंद्र स्तरावर संकलीत कचऱ्याची शास्त्रोत्क पध्दतीने विल्हेवाट लावणे, केंद्रांची देखभाल दुरुस्ती करणे ईत्यादी करीता व्यावसायिक/स्वयंसेवी संस्थाची सुची तयार करण्यात येत आहे.

करीता स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत नागपूर जिल्हयात तालुकास्तरावरील प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्र चालविण्याकरीता ईच्छुक असणाऱ्या व प्लास्टीक, घनकचरा स्वच्छता क्षेत्रातील कामाचा अनुभव असणाऱ्या व्यावसायिक/स्वयंसेवी संस्थाकडुन अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबतचे कामाचे प्रारुप, अटी व शर्ती www.nagpurzp.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख: २1/06/2023** **वेळ: सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा**
**जि.प.नागपूर**

**प्रकल्प संचालक (पा.पु.व स्व.)**
**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**
**जि.प.नागपूर**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नागपूर**

**दुरध्वनी क्रमांक: ०७१२-२५५०३९८** **ई-मेल- sbmg2zpnagpur@gmail.com**

**कार्यालयाचा पत्ता: जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष, जुनी इमारत, दुसरा माळा, जिल्हा परिषद परिसर, सिव्हिल लाईंस, नागपूर**

CamScanner

# जिल्हा परिषद, नागपूर
## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन

**स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत जिल्हयातील ग्रामीण भागात तालुकास्तरावर प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्रांची निर्मीती करण्यात येत आहे. प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्र व्यावसायिक पध्दतीवर चालविणे, केंद्र स्तरावर संकलीत कचऱ्याची शास्त्रोत्क पध्दतीने विल्हेवाट लावणे, केंद्रांची देखभाल दुरुस्ती करणे, ईत्यादी करीता अर्ज सादर करण्याबाबत.**

**व्यावसायिक स्वयंसेवी संस्थेचा नाव** ----------------------------------------------------------------

**पत्ता:**--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**संपर्क व्यक्तीचे नाव-**

**संर्पक क्रमांक-**

**संस्थेचा ईमेल आयडी-**

CamScanner

## प्रारुप- अ

## स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटक

| अ.क्र. | विवरण | विश्लेषण | गुण |
|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा विषयासंबधी अनुभव | संस्थेस ग्रामीण भागात प्लास्टीक घनकचरा व्यवस्थापन केंद्र चालविण्याचा व स्वच्छतेच्या क्षेत्रात संदर्भात कामाचा किमान ३ वर्ष व त्यापेक्षा अधिक अनुभव असावा | 35 |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | संस्थेस शासनाचे इतर विभाग व पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग अथवा पंचायत समिती/ग्राम पंचायत/ नगर परिषद/नगर पंचायत सोबत कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा | 20 |
| 3 | तज्ञ व प्रशिक्षीत मनुष्यबळ | संस्थेकडे विषयाचे अनुषंगाने किमान २ अनुभवी स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता/रासायनिक अभियंता (पदविका/ पदवी) व ३ अनुभवी सामाजकार्य पदवी अथवा त्यापेक्षा अधिक असायला हवे. | 10 |
| 4 | लेखा परिक्षण | संस्थेने मागील ३ वर्षाचे लेखा परिक्षण व अहवाल मान्यकृत सनदी लेखापाल व्दारा केलेला असावा. | 10 |
| 5 | आर्थिक उलाढाल | संस्थेची मागील ३ वर्षातील कुठल्याही वर्षीची उलाढाल किमान १ कोटी व त्यापेक्षा अधिक असावी | 10 |
| 6 | जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र | संस्थेचे मुख्य कार्यालय व संस्थेचे कार्यक्षेत्र नागपूर जिल्हातंर्गत असल्यास व नागपूर जिल्हयात ग्रामीण भागात ग्राम पंचायत सोबत अश्या प्रकारचा प्रकल्प सुरु असल्यास प्राधान्य राहील. | 15 |
| | | **एकुण गुण** | **100** |

CamScanner

**प्रारुप- ब**

<table>
<tr><th colspan="5">प्रारुप - अ नुसार स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था निवडी करीता गुणांकन घटकाचे वर्गीकरण</th></tr>
<tr><th>अ.क्र.</th><th>विवरण</th><th>अनुभव वर्षात</th><th>गुण</th><th>शेरा</th></tr>
<tr><td rowspan="2">1</td><td rowspan="2">संस्थेचा घनकचरा व प्लास्टीक वेस्ट व्यवस्थापन, विषयक कामाचा अनुभव</td><td>३ वर्षे पेक्षा कमी</td><td>25</td><td rowspan="2">सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 25 गुण आवश्यक</td></tr>
<tr><td>किमान ३ वर्ष व त्यापेक्षा अधिक</td><td>35</td></tr>
<tr><td rowspan="2">2</td><td rowspan="2">शासकीय कामाचा अनुभव</td><td>किमान ३ वर्षेपेक्षा कमी</td><td>15</td><td rowspan="2">सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 15 गुण आवश्यक</td></tr>
<tr><td>ग्रामीण भागात ग्रा.प.स्तरावरील प्लास्टीक व्यवस्थापनाचा किमान ३ वर्षाचा अनुभवास प्रधान्य</td><td>20</td></tr>
<tr><td rowspan="2">3</td><td rowspan="2">मनुष्यबळ</td><td>किमान २ अनुभवी स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता/रासायनिक अभियंता (पदविका/ पदवी) व ३ समाजकार्य पदवी तज्ञ</td><td>5</td><td rowspan="2">सदर घटकातंर्गत निवडी करिता किमान 5 गुण आवश्यक</td></tr>
<tr><td>उपरोक्त पेक्षा अधिक</td><td>10</td></tr>
<tr><td>4</td><td>लेखा परिक्षण</td><td>मागील ३ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल</td><td>10</td><td>10 गुण अनिवार्य</td></tr>
<tr><td rowspan="2">5</td><td rowspan="2">आर्थिक उलाढाल</td><td>मागील ३ वर्षात कुठल्याही वर्षी वार्षिक उलाढाल किमान १ कोटी पेक्षा कमी असल्यास</td><td>5</td><td rowspan="2">सदर घटकातंर्गत निवडी करीता किमान 5 गुण आवश्यक</td></tr>
<tr><td>मागील ३ वर्षात कुठल्याही वर्षी किमान १ कोटी व त्यापेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असल्यास</td><td>10</td></tr>
<tr><td rowspan="2">6</td><td rowspan="2">जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र</td><td>संस्था मागील किमान ३ वर्षे पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास</td><td>5</td><td rowspan="2">किमान 5 गुण आवश्यक</td></tr>
<tr><td>संस्था मागील किमान ३ वर्षापेक्षा अधिक कालावधी पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास व ग्रामीण क्षेत्रात प्लास्टीक व्यवस्थापना बाबत प्रकल्प सुरु असल्यास</td><td>15</td></tr>
<tr><td colspan="4">उपरोक्त प्रमाणे घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक 65 गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.</td><td>किमान 65 गुण</td></tr>
</table>

CamScanner

## प्रारुप- क

## स्वयंसेवी व व्यावसायिक संस्था अनुभव

| अ.क्र. | विवरण | अनुभव वर्षात | संस्था पुर्ण करीत असलेली अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | संस्थेचा प्लास्टीक व घनकचरा विषयासंबधी अनुभव | ३ वर्षापेक्षा कमी | |
| | | किमान ३ वर्षे व त्यापेक्षा अधिक | |
| 2 | शासकीय कामाचा अनुभव | ३ वर्षापेक्षा कमी | |
| | | ग्रामीण भागात ग्रा.प.स्तरावरील प्लास्टीक व्यवस्थापनाचा किमान ३ वर्षाचा अनुभवास प्रधान्य | |
| 3 | मनुष्यबळ | अनुभवी स्थापत्य/ पर्यावरणीय अभियंता/रासायनिक अभियंता (पदविका/ पदवी) व ३ समाजकार्य पदवी तज्ञ | |
| | | उपरोक्त पेक्षा अधिक | |
| 4 | लेखा परिक्षण | मागील ३ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल | |
| 5 | आर्थिक उलाढाल | मागील ३ वर्षात कुठल्याही वर्षी वार्षिक उलाढाल किमान १ कोटी पेक्षा कमी असल्यास | |
| | | मागील ३ वर्षात कुठल्याही वर्षी किमान १ कोटी व त्यापेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असल्यास | |
| 6 | जिल्हा अंतर्गत कार्यक्षेत्र | संस्था मागील किमान ३ वर्षे पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास | |
| | | संस्था मागील किमान ३ वर्षे पेक्षा अधिक कालावधी पासुन जिल्हयात कार्यरत असल्यास व ग्रामीण क्षेत्रात प्लास्टीक व्यवस्थापना बाबत प्रकल्प सुरु असल्यास | |

**प्रपत्र ब मध्ये नमुद केल्याप्रमाणे घटक निहाय सर्व घटक मिळुन किमान आवश्यक ६५ गुण प्राप्त होणाऱ्या संस्थाची अंतिम निवड यादि प्रसिध्द करण्यात येईल.**

CS CamScanner

## स्वारस्य अभिव्यक्ती सादर करणाऱ्या व्यावसायिक संस्था व स्वयंसेवी संस्था संस्थानी अर्जा सोबत सादर करावयाची कागदपत्रे.

- संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र.
- व्यावसायिक संस्था करीता कंपनी अधिनियम १९५६, भागीदारी कायदा किंवा सहकार कायदा अंतर्गत अन्य तत्सम प्राधिकरण नोंदणी प्रमाणपत्र.
- मागील ३ वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल.
- संस्थेचे शेडयुल ए व बी. व्यावसायिक संस्थाचे सदस्य संबंधातील दस्ताऐवज.
- GST, PAN नंबर व प्रमाणपत्र.
- Income Tax उत्पन्न कर भरल्याबाबत प्रमाणपत्र.
- उपलब्ध मनुष्यबळ यादी शिक्षण व अनुभवासह.- गोषवारा विवरणपप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- कामाचा अनुभवाचे आदेश व अहवाल. - गोषवारा विवरण पप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- आर्थिक उलाढाल संदर्भात बँक विवरण अथवा सनदी लेखापाला यांचे प्रमाणपत्र. गोषवारा विवरणपप्रत्र क मध्ये नमुद करावे.
- संस्था काळा यादीत समाविष्ट नसल्याचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.
- व्यावसायिक संस्था करिता व्यवसाय व कर नोंदणी प्रमाणपत्र.भागीदारी व्यासायिक संस्था प्रमाणपत्र.
- संस्थेने अर्जासोबत जोडलेली व नमुद केलेली सर्व माहिती हि सत्य असल्याचे स्वंयघोषित प्रमाणपत्र.

CamScanner

## प्रपत्र-इ

**व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांचे एम्पॅनेलमेंट करीता अटी व शर्ती.**

१. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था नोंदणीचे प्रमाणपत्र अनिवार्य असुन सादर करावे लागतील.

२. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थाना यांचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल सादर करावे लागतील.

३. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थाना GST प्रमाणपत्र, पॅनकार्ड आवश्यक आहे.

४. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांनी मागील वर्षातील Income Tax भरल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थान कडे अनुभवी सोशल व तांत्रिक मनुष्यबळ असने गरजेचे आहे.

६. एम्पॅनलमेंट करण्यात येणा-या संस्थेचा कार्यकाळ ११ महिने कालावधीचा राहील. तदनंतर, निवड झालेल्या संस्थेच्या कामाचे मूल्यमापन करुनच मुदतवाढ देण्यात येईल. तथापी याबाबत अंतिम निर्णय हा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा राहील.

७. संस्थेस ग्रामिण भागात प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्र तसेच याविषया संदर्भात ग्राम पंचायती सोबत कामाचा अनुभव असावा.

८. नागपूर जिल्हयातंर्गत कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

९. सर्शत अर्ज स्वीकारण्यात येणार नाही.

१०. जाहिराती प्रक्रियेमध्ये प्राप्त संस्थाची यादी गुणांकणाचे आधारे तयार करण्यात येईल.सर्वाधिक गुण प्राप्त ३ संस्थाना सादरी करणा करीता आंमत्रित करण्यात येईल. व सादरीकरणात जिल्हा स्तरीय प्लास्टीक व्यवस्थापन समितीचे गुणांकणा नुसार एक संस्थेची निवड अंतिम करण्यात येईल.

११. संस्थेची निवड ही किमान प्राप्त गुणांच्या आधारे अंतिम करण्यात येईल. प्रपत्र ब मधील विवरणानुसार किमान ६५ गुण प्राप्त असणाऱ्या संस्थाचे पुढील निवड प्रकीये करीता पात्र राहतील.

१२. जाहिरात प्रक्रियेमध्ये पात्र असणाऱ्या संस्थाची यादी हि कार्यादेश म्हणुन समजण्यात येणार नाही.

१३. ग्राम पंचायत स्तरावर कामाचे अनुषंगाने सक्षम प्राधिकरण यासंबंधी कार्यादेश निर्गमित करेल.

१४. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था जाहीरात प्रकाशित झाल्याचे दिनांक पासुन ७ दिवसांचे आत पंजीकृत पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयात प्रस्ताव सादर करु शकतील. उशीरा आलेले प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही.

१५. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्थांचे प्रस्ताव मुदत कालावधी मध्ये कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत स्वीकृत करण्यात येईल.

१६. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांनी प्रस्ताव सादर करते वेळी उपरोक्त नमुद सर्व प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

१७. निवड करण्यात आलेल्या व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्थेस र. ५००/- च्या मुद्रांकावर विहित नमुन्यात निश्चित अटी व शर्ती नुसार संबंधीत प्राधिकरणा सोबत करार करणे बंधनकारक राहील. व त्या करारनुसार संस्थेस काम करणे बंधनकारक राहील.

१८. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था यांना सक्षम प्राधिकरणा मार्फत कार्यादेश प्राप्त झाल्यांनंतर निश्चीत करुन देण्यात आलेल्या मुदतीत कामे पूर्ण करणे ही जवाबदारी संस्थेची राहील.

१९. प्रकल्पात निवडण्यात आलेल्या गावांची व व्यवस्थापन केंद्राची संख्या निधीच्या उपलब्धते नुसार कमी जास्त करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नगापूर यांना राहील.

२०. व्यावसायिक संस्था/ स्वयंसेवी संस्था निवडीची प्रक्रिया कुठल्याही स्तरावर थांबविण्याची, रदद करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे राखीव राहतील.

CamScanner

२१. संस्थानी करार झाल्यानंतर कोणत्याही टप्यावर कराराचा भंग केल्यास अथवा सेवा थांबविल्यास करार रद्द करण्यात येईल

२२. करारनाम्यातील अटी व शर्ती व अनामत रक्कम इत्यादि बाबचा निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

२३. संस्थाचे काम, सेवा समाधानकारक नसल्यास त्यांचे कामाबाबत ग्राम पंचायत मार्फत तक्रार प्राप्त झाल्यास अथवा ग्राम पंचायत व संस्था यांचे दरम्यान कुठल्याही विषयावर वाद उत्पन्न झाल्यास यासंदर्भात अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचा राहील.

२४. करारात नमुद शिवाय इतर कुठल्याही कारणास्तव विवाद असल्यास सदर प्रकरण न्याय प्रविष्ट करण्यात येणार नाही.

२५. प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत जिल्हयात प्रत्येक तालुकास्तरावर प्लास्टीक व घनकचरा साहित्य पुर्नप्राप्ती केंद्र (MRFs) तयार करण्यात येणार असुन या केंद्रावर संबंधीत तालुक्यातील सर्व गावातील प्लास्टीक व घनकचरा संकलीत करुन त्याचे व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

२६. प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्रापर्यत जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतस्तरावर गोळा होणारा कचरा पोहचविण्याची व्यवस्था संबंधीत ग्राम पंचायत करणार आहे. याव्यतिरीक्त इतर कचरा आवश्यकतेनुसार गोळा करण्याकरीता संस्था जिल्हा परिषदेच्या मान्यतेनुसार स्वतंत्र व्यवस्था उभारु शकेल. तथापि, या करिता संस्थेस वाहनाकरीता लागणारा खर्च हा या प्रकल्पातील उत्पन्नातुन भागविता येणार नाही.

२७. प्लास्टीक व घनकचरा व्यवस्थापन केंद्र संचालन करीत असतांना महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळव्दारा निर्धारीत नियमांचे पालन करणे अनिवार्य राहील.

२८. उपरोक्त नमुद केंद्र विभागामार्फत पुर्ण सुविधा सह स्थापित करण्यात येणार असुन ही केंद्र सर्व प्रकारच्या दायित्वासह (मनुष्यबळ/ विद्युत/पाणी कर/इतर सर्व खर्च) चालविण्याची जबाबदारी कार्यदेश प्राप्त होणाऱ्या संस्थेची राहील.

२९. सदर केंद्र संचालीत करीत असतांना कुठली ही दुर्घटना, अपघात अथवा इतर अपवादात्मक /आकस्मिक घटना अनुचित घटना घडल्यास याबाबत सर्वस्वी जवाबदारी ही संचालन करणाऱ्य संस्थेची राहील.

३०. सदर केंद्रावर संकलीत होणारा कचरा व त्यावरील पुढील प्रकीयेअंती होणारे उत्पन्नाबाबत प्रायोगिक तत्वावर ३ महिने तथ्य संकलीत करण्यात येईल व त्याआधारे पुढील काळात एकुण होणाऱ्या निव्वळ उत्पन्नाच्या किंमान ३० टक्के रक्कम जिल्हा परिषदेस अदा करणे अनिवार्य राहिल.

३१. निवड झालेल्या संस्थेला कामाचा नियमित अहवाल संबंधित विभागास वेळोवेळी सादर करावा लागेल.

(उमल चांदेकर)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा
जि.प.नागपूर

(संजय वानखेडे)
प्रकल्प संचालक (पा.पु.व स्व.)
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
जि.प.नागपूर

(सौम्या शर्मा)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

CamScanner